ex

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी......

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१४/प्र.क्र.२०७/एसएम-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दिनांक: २५ जून,२०१४

वाचा

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३) /माशि-१, दिनांक १५ जून, २०१३.

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. स्वयंअ-२०१३/ (८५/१३)(II) /माशि-१, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३

## प्रस्तावना

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये ३२४७ संस्थांच्या शाळा पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. तथापि, सदर शासन निर्णयामध्ये पात्र झालेल्या प्रस्तावांपैकी काही प्रस्तावांच्या शाळांच्याबाबतीत त्यांनी मूळ प्रस्तावामध्ये मागणी केल्यानुसार अभ्यासक्रम, शाळांचे माध्यम, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक वा प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा मंजूर झाल्या नव्हत्या. तसेच अपात्र झालेल्या प्रस्तावांच्या बाबतीत संबंधित संस्थांनी आपल्या निवेदनाव्दारे या बाबी शासनाच्या निदर्शनास आणल्या आहेत. संबंधित संस्थांची निवेदने तसेच, क्षेत्रीय कार्यालयाचे अभिप्राय/अहवालाच्या अनुषंगाने दुरुस्त्या व परवानगीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये अर्ज केलेल्या संस्थानी त्रुटींची पूर्तता केल्यामुळे सोबतच्या "विवरणपत्र-अ" नुसार त्यांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करण्यास परवानगी देण्यात येत आहे, संदर्भाधीन

शासन निर्णय दिनांक १५ जून, २०१३ व ५ ऑक्टोबर, २०१३ अन्वये यापूर्वी उपरोक्त अधिनियमाखाली परवानगी देण्यात आली होती त्या शासन निर्णयामधील अटी शर्ती या संस्थांनासुध्दा लागू राहतील. संदर्भाधिन शासन निर्णयान्वये मंजूरी दिलेल्या शाळांपैकी "विवरणपत्र'ब" मध्ये दर्शविलेल्या शाळांबाबतीत त्यांच्यासमोर दर्शविलेल्या दुरुस्ती/सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या अधिनियमाखाली शासन परवानगी दिलेल्या संस्थांच्या बाबतीत खालील बाबींची शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांच्या स्तरावर खातरजमा करण्यात यावी :-

१) शाळेने प्रस्तावित केलेली जागा/जमीन नियमानुसार किमान २ एकर सलग/अथवा शाळेसाठी योग्य असल्याची संबंधित शिक्षणाधिकारी यांनी खात्री करावी. सदर जागा/जमीन नियमानुसार आढळून न आल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

२) दाननिधी (कायम मुदतठेव) पावती संस्थेच्या नावावर शाळा मान्यतेचा प्रस्ताव दाखल केल्याच्या दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर त्याचे नूतनीकरण करण्याबाबत संबंधित संस्थेची /शाळा व्यवस्थापनाची व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांची जबाबदारी राहील. अशी कायम मुदतठेवीची मूळ पावती संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडे तारण म्हणून ठेवावी .

२. सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्था यांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१४०६२६१७३०३८६९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2014.06.27 13:37:34 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त

३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

८. विभागांतर्गत सर्व संचालक.

९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)

११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

१२. संबंधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपालिका

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

२. मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

३. मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

४. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. निवडनस्ती (एसएम -२).

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१४/प्र.क्र.२०७/एसएम-२, दि. २५ जून, २०१४ चे सहपत्र महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत परवानगी देण्यात येत असलेल्या शाळांची यादी.

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्याबाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| 20 | पुणे | भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम आझाद प्रतिष्ठान बारामती जि.पुणे | भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम इंग्लिश मेडियम स्कुल, भिगवण रोड ता. बारामती जि.पुणे | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 21 | पुणे | मावळ शिक्षण प्रतिष्ठान तळेगाव दाभाडे ता. मावळ जि.पुणे | प्रतिक विद्यानिकेत निगडे ता. मावळ जि.पुणे | उच्च माध्यमिक | दर्जावाढ | मराठी | पात्र |
| 22 | पुणे | प्रगती शिक्षण संस्था, पुणे | प्रगती विद्या मंदिर, पुणे | माध्यमिक | दर्जावाढ | मराठी | पात्र ४० हजार राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्याच्या अटीवर पात्र |
| 23 | पुणे | युगंधर शिक्षण संस्था ता. शिरुर जि.पुणे. | सी.एस.मुजबळ ग्लोबल स्कुल, मलठण ता.शिरुर जि.पुणे | प्राथमिक (सी.बी.एस.ई) | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 24 | बुलढाणा | महात्मा फुले शिक्षण संस्था, निमगाव ता.जि. बुलढाणा | महात्मा फुले हायस्कुल, निमगाव ता. जि. बुलढाणा | उच्च माध्यमिक | दर्जावाढ | मराठी | पात्र |
| 25 | वर्धा | कस्तुरबा वुमेन्स मल्टीपरपज, सोसायटी बोरगाव (मेघे) वर्धा | कस्तुरबा ज्युनिअर कॉलेज, रोठा ता.जि. वर्धा | उच्च माध्यमिक | दर्जावाढ | मराठी | पात्र |
| 26 | वाशिम | जनता बहुउददेशीय संस्था, मानोरा, जि. वाशिम | अलमेहमुद इंटरनॅशनल स्कूल, मु.पो. कानडी, अकोटरोड, अकोला | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 27 | सांगली | राधाकृष्ण शिक्षण प्रसारक मंडळ, कोरेगाव ता. वाळवा जि. सांगली | भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम इंग्लिश मिडीयम स्कूल, कोरेगाव, ता. वाळवा, जि.सांगली | प्राथमिक ते माध्यमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 28 | ठाणे | आगरी विद्यार्थी मंडळ, २ भोईवाडा, नारपोली, आग्रारोड, भिवंडी, जि.ठाणे | २ भोईवाडा, नारपोली, आग्रारोड, भिवंडी, जि.ठाणे | प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |

विवरणपत्र - ब

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१४/प्र.क्र.२०७/एसएम-२, दि. २५ जुन, २०१४ चे सहपत्र महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत परवानगी देण्यात येत असलेल्या शाळांची यादी.

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सुचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| **दुरूस्ती प्रस्ताव** | | | | | | | |
| 1 | ठाणे | मुंबई हिंदी साहित्य परिषद, स्टेशन रोड माटुंगा,] | श्रीम. इंदिरा गांधी उच्च माध्यमिक विद्यालय, गोखिवरे, नालासोपारा जि ठाणे | उच्च माध्यमिक (कला, वाणिज्य व विज्ञान) | दर्जावाढ | इंग्रजी | पात्र |
| 2 | पुणे | ज्ञान कला क्रीडा व कृषी प्रतिष्ठान, कळंब ता. इंदापूर जि.पुणे | कै. साहेबराव फडतरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कळंब ता. इंदापूर जि.पुणे | माध्यमिक ते उच्च माध्यमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |
| 3 | वर्धा | सबरंग मल्टीपरपज एज्युकेशन सोसायटी वर्धा | सनसाईन हायस्कूल, सेवाग्राम वर्धा | प्राथमिक ते उच्च प्राथमिक | नवीन शाळा | इंग्रजी | पात्र |